(३१) (३३)

५५

स्वेच्छेने सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना अंतिम रजा देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक एलव्हीई-२४७८/सीआर-२४५/एसईआर-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ फेब्रुवारी १९८३

## निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक जीसीएस १६७७/सीआर-१७९२/ए/७६/एसईआर-४, दिनांक ४ मार्च, १९७८ अन्वये दिलेल्या आदेशानुसार ज्या शासकीय कर्मचाऱ्याची २० वर्षे इतकी अर्हताकारी सेवा पूर्ण झाली आहे, असा कर्मचारी नियुक्ती प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर स्वेच्छेने निवृत्त होऊ शकतो. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ (एम) मध्ये "अंतिम (टर्मिनल) रजा" मंजूर करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही अंतिम रजा किती मंजूर करावी व रजेच्या कालावधीत किती रजा-वेतन व भत्ते अनुज्ञेय असतील या विषयी वेळोवेळी चौकशी केली जात आहे. उक्त शासन निर्णयातील परिच्छेद २(एम) मधील तरतुदीमध्ये काही अंशी फेरबदल करून शासन आता पुढील स्पष्टीकरण करीत आहे:-

(१) अशा शासकीय कर्मचाऱ्याने स्वेच्छा निवृत्तीच्या तारखेस म्हणजेच ३ महिन्यांची नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेस देय व अनुज्ञेय असलेल्या रजेसाठी, किंवा तो ज्या तारखेस रजेवर जाईल त्या तारखेस देय व अनुज्ञेय असणाऱ्या आणि अंशतः नोटिशीच्या मुदती बरोबरच चालू राहणाऱ्या रजेसाठी अर्ज केल्यास, त्याला, "अंतिम रजा" म्हणजेच १८० दिवसांच्या कमाल मर्यादेत अधीन राहून अर्जित रजा आणि त्यानंतर नियत वयमानाच्या तारखेपर्यंत देय व अनुज्ञेय असलेली अर्धपगारी रजा मंजूर करण्यात यावी.

Live file

(२) अंतिम रजेच्या कालावधीत महागाई भत्ता हा, निवृत्तिवेतनाची रक्कम आणि सेवा निवृत्ति लाभाचे निवृत्तिवेतन सममुल्य वजा करण्यापूर्वीच्या एकूण रजा वेतनाच्या आधारे काढण्यात येईल. परंतु, अंतिम रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय होणाऱ्या महागाई भत्त्याच्या रकमेतून "निवृत्तिवेतनधारकांना वाढ, म्हणून निवृत्तिवेतना व्यतिरिक्त अनुज्ञेय असलेली रक्कम कापून घेण्यात यावी.

(३) स्थानिकपूरक भत्ता, घरभाडे भत्ता यांसारखे इतर भत्ते, सेवा संपण्याच्या तारखे-पासून म्हणजेच नोटिशीची मुदत संपल्यानंतर अनुज्ञेय असणार नाहीत.

(४) अशा अंतिम रजेचे रजावेतन फक्त एकदाच एक रकमी ठोक देण्यात यावे. निवृत्तिवेतन, निवृत्तिवेतनावरील वाढ व सेवा निवृत्ति लाभाचे निवृत्तिवेतन सममुल्य यांची वसुली, जास्तीत जास्त १८० दिवसापर्यन्त मिळणाऱ्या अर्जित रजेच्या रजावेतनातून करण्यात येणार नाही. परंतु अर्धपगारी रजेच्या रजावेतनातून निवृत्तिवेतन, सेवानिवृत्ति लाभाचे निवृत्तिवेतन सममुल्य व निवृत्तिवेतनावरील वाढ यांची रक्कम कापून घेण्यात येईल. अर्धपगारी रजा जर महागाई भत्ता अनुज्ञेय असलेल्या पहिल्या १८० दिवसांच्या सलग रजेत असेल, तर त्यात अनुज्ञेय महागाई भत्त्याचा समावेश केला जाईल. जेथे निवृत्तिवेतन, निवृत्ति वेतनावरील वाढ व सेवानिवृत्ति :

लाभांचे सममुल्य यांची रक्कम रजावेतनापेक्षा जास्त असेल, अशाबाबतीत शासकीय कर्मचाऱ्यास काहीही रक्कम देय असणार नाही.

२. वरील स्पष्टीकरणानुसार, अंतिम रजेचे म्हणजेच अर्जित रजा व अर्धपगारी रजा यांचे रजावेतन पुढील पध्दतीने काढण्यात यावे:-

(१) अर्जित रजा:

अर्जित रजेच्या बदली मिळणारी रोख रक्कम = (वेतन + सेवानिवृत्तिच्या तारखेस अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता) / 30 × १८० दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन अंतिम रजा म्हणून मंजूर केलेल्या अर्जित रजेचे दिवस

(२) अर्धपगारी रजा:

अर्धपगारी रजेच्या बदली मिळणारी रोख रक्कम = (अर्धपगारी रजेचे रजा वेतन + अनुज्ञेय असल्यास महागाई भत्ता (वजा) निवृत्तिवेतन, सेवानिवृत्ति लाभांचे निवृत्ति वेतन सममुल्य आणि अर्धपगारी रजेवर महागाई भत्ता अनुज्ञेय असल्यास निवृत्तिवेतनावरील वाढ) / 30 × निवृत्तिच्या तारखेस नियमांत विहित केलेल्या मर्यादेच्या अधीन मंजूर केलेल्या अर्धपगारी रजेचे दिवस

३. हे आदेश दिनांक १ मार्च १९७८ पासून अंमलात येतील.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये आवश्यक त्या सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

५. या निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्यं. दे. पानसे,
शासनाचे सह सचिव.

प्रत रवाना:-

महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर,

लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, नवी मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर-९.

---

*पत्राव्दारे.

१९८३ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना -

Grant of terminal leave to the Government servants retiring voluntarily.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department
Resolution No.LVE-2478/CR-245/SER-9
Mantralaya, Bombay 400 032, dated 18th February 1983.

# RESOLUTION

As per the orders issued under Government Resolution, Finance Department, No.GCS-1677/CR-1792/A/76/SER-4, dated the 4th March 1978, a Government servant who has completed 20 years of qualifying service can retire voluntarily after giving notice of three months to the appointing authority. A provision has been made in para 2(m) of the said Resolution for the grant of terminal leave. Enquiries have been received from time to time seeking clarification about the quantum of terminal leave to be granted and the leave salary and allowances admissible during terminal leave. In partial modification of the provisions contained in para 2(m) of the said Resolution Government is pleased to clarify that:-

(i) such a Government servant should be granted, if he applies for leave due and admissible on the date of voluntary retirement, viz., at the end of expiry of 3 months' notice period or that due and admissible on the date he proceeds on leave partly running concurrently with notice period, as terminal leave, i.e., earned leave subject to a maximum of 180 days followed by half pay leave due and admissible upto the date of superannuation;

(ii) during terminal leave, the dearness allowance will be calculated on the gross leave salary before deduction of pension and pension equivalent of retirement benefits, but the amount of dearness allowance payable to the employee on terminal leave, should be reduced by the amounts of relief to pensioners that is admissible over and above the pension;

(iii) other allowances viz. Compensatory Local Allowance and House Rent Allowance shall not be admissible from the date of cessation of service i.e. after expiry of the notice period;

(iv) the leave salary for such terminal leave shall be payable in lump-sum as one time settlement. No recovery of the amount of pension, relief on pension and pensionary equivalent of other retirement benefits shall be made from the amount of the leave salary for the earned leave component subject to a maximum of 180 days. But the leave salary for the half-pay leave component shall be subject to reduction by the amount of pension, pensionary equivalent of other retirement benefits and including relief on pension even if half-pay leave falls within first 180 days' continuous leave for which dearness allowance is admissible. Where the amount of pension, relief on pension and pensionary equivalent of other retirement benefits are more than the amount of leave salary, nothing shall be payable to the Government servant.

2. In the light of the above clarifications, the leave salary payable for the terminal leave i.e. earned leave and half pay leave components shall be calculated in the manner indicated below:-

(i) Earned Leave:

$$\text{Cash payment in lieu of Earned Leave Component} = \frac{\text{Pay + D.A. admissible on the date of retirement}}{30} \times \text{Number of days of earned leave granted as terminal leave subject to a maximum of 180 days}$$

(ii) Half Pay Leave:

$$\text{Cash payment in lieu of half pay leave component} = \frac{\text{Half pay leave salary + D.A. if admissible (minus) Pension, Pension equivalent of gratuity and relief on pension if D.A. is admissible on half pay leave}}{30} \times \text{Number of days of half pay leave granted on the date of retirement subject to the limits prescribed under the rules.}$$

3. These orders shall be effective from 1st March, 1978.

4. Necessary amendment to the Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981 will be issued in due course.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. D. PANSE,
Joint Secretary to Government.